# वसई विरार शहर महानगरपालिका

## जमा व खर्चाचे सन 2025-26 सुधारित व सन 2026-27 चे मूळ अंदाजाबाबत आयुक्त यांचे अर्थसंकल्पीय निवेदन

मा. स्थायी समिती सभापती व सन्मा. सभागृह

वसई विरार शहर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 95 अन्वये मी सन 2025-26 या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित अंदाज व सन 2026-27 या वर्षाचे मुळ अंदाज तयार केले असून याच अधिनियमाचे कलम 96 नुसार सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर विचार विमर्ष करुन अर्थसंकल्प मा. महासभेपुढे सादर करणेस मा. स्थायी समितीच्या शिफारसीसाठी सादर करण्यात आलेले आहे.



**मनोजकुमार सुयंवशी** (भा.प्र.से.)
**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

### अर्थसंकल्पीय गोषवारा

**(रु. लाखात)**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा. प्रशासक यांनी स्विकृत केलेल्या रकमा सन 2025-26 | सुधारित अंदाजपत्रक 2025-26 | मुळ अर्थसंकल्प 2026-27 मा. आयुक्त |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रारंभिक शिल्लक | 83498.45 | 85420.66 | 73316.82 |
| 2 | महसुली जमा | 209784.71 | 172096.61 | 227054.44 |
| 3 | भांडवली जमा | 71085.07 | 36798.59 | 75761.07 |
| 4 | असाधारण व ऋण निलंबन जमा | 29141.49 | 25155.42 | 44766.87 |
| 5 | एकत्रित जमा रकमा | 310011.26 | 234050.62 | 347582.37 |
| 6 | प्रारंभिक शिल्लकेसह एकत्रित जमा रक्कम | 393509.71 | 319471.29 | 420899.19 |
| 7 | महसुली खर्च | 204027.49 | 134265.20 | 171555.92 |
| 8 | भांडवली खर्च | 161910.40 | 88900.82 | 206238.78 |
| 9 | असाधारण व ऋण निलंबन खर्च | 27354.47 | 22988.44 | 42892.47 |
| 10 | एकत्रित खर्च रकमा | 393292.36 | 246154.47 | 420687.17 |
| 11 | अखेर शिल्लक रकमा | 217.35 | 73316.82 | 212.02 |
| 12 | अखेरच्या शिलकेसह एकत्रित खर्च रक्कम | 393509.71 | 319471.29 | 420899.19 |

आज वसई-विरार महानगरपालिकेचे सन 2026/27 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक सादर करताना मला केवळ आनंदच नाही, तर शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी नव्या स्वप्नांची, नव्या दिशेची आणि नव्या उंचीची सुरुवात होत असल्याची जाणीव होत आहे. आपल्या शहराची ओळख केवळ वाढत्या लोकसंख्येमुळे नाही, तर संस्कृती, पर्यावरण, विकास आणि नागरिकांच्या आशा-अपेक्षांनी समृद्ध अशा आधुनिक शहराच्या

रूपाने होत आहे. दर्जेदार नागरी सुविधा, पर्यावरणपूरक विकास आणि सर्वसमावेशक समाज निर्माण करणे हेच आपल्या महानगरपालिकेचे ध्येय आहे.

प्रशासन अधिक पारदर्शक, जलद आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी ई-गव्हर्नन्स सक्षमीकरण, डिजिटल सेवा विस्तार, Land Estatemanagement Software आणि एकत्रित कमांड-कंट्रोल सेंटर यांसारख्या आधुनिक उपक्रमांना गती देण्यात येत आहे. लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक नागरिकाला वेळेत आणि विश्वासार्ह सेवा मिळावी, हा आमचा निर्धार आहे.

या अंदाजपत्रकात पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि पर्यटन विकास यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी दिव्यांग पार्क, संविधान पार्क, बर्ड पार्क, रांगोळीचे गाव, फुलांचे गाव आणि मच्छीमारांचे गाव अशा संकल्पना विकसित केल्या जात आहेत. दिव्यांग पार्कमध्ये व्हीलचेअर फ्रेंडली पाथवे, सुलभ शौचालये, ध्वनी-दृश्य सूचना प्रणाली, हरित क्षेत्र आणि सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यामुळे प्रत्येक दिव्यांग नागरिकाला स्वाभिमानाने फिरता येईल. संविधान पार्कमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना साकार करणारी संसद भवनाची प्रतिकृती, म्युरल वॉल, ओपन एअर एमपी थिएटर, ग्रँड म्युझियम आणि लायब्ररी उभारून नव्या पिढीला संविधानाची प्रेरणा दिली जाईल.

क्रीडा क्षेत्रात चंदनसार येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण संकुल आणि बोळींज येथील म्हाडा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स युवकांना नवी दिशा देतील. आरोग्य क्षेत्रात मौजे आचोळे येथे ४०० खाटांचे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, सोपारा रुग्णालयातील TB कक्ष आणि आरोग्यवर्धिनी केंद्रांचा विस्तार हे नागरिकांच्या आरोग्याची मजबूत हमी ठरेल.

पाणीपुरवठ्यासाठी नवीन जलकुंभ, महाराष्ट्र नगरोत्थान अंतर्गत भुयारी गटारी योजना, १३ मुख्य रस्त्यांचे काँक्रिटीकरण, ऊर्जा कार्यक्षम LED दिवे आणि सोलार प्रकल्प यामुळे शहर अधिक सक्षम व पर्यावरणपूरक बनेल. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी SATIS योजना, नवीन पार्किंग लॉट, रेल्वे ओव्हरब्रिज, उड्डाणपूल आणि ३८ किमी रिंग रोड प्रकल्प राबवून शहराच्या विकासाला गती दिली जाईल.

सफाई कामगारांसाठी घरे, 31 प्रेक्षणीय स्थळांचा पीपीपी तत्वावर विकास, वसई-विरार दर्शन बस सेवा, तलावांमध्ये जलक्रीडा आणि समुद्रकिनाऱ्यांचे सुशोभीकरण यामुळे पर्यटन व रोजगार निर्मितीला चालना मिळेल. स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापन व जनजागृती उपक्रमांमुळे पर्यावरणाबद्दल जागरूक नागरिक घडविण्याचा प्रयत्न सुरू आहे. जाहिरात विभागातून महसूल वाढविणे, सोलार ऊर्जा वापर आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून आर्थिक शाश्वततेकडे वाटचाल केली जात आहे.

गुजरात गॅसच्या CSR अंतर्गत स्मशानभूमींना मोफत गॅस सुविधा, प्राण्यांसाठी गॅसदाहिनी, तुंगारेश्वर देवस्थान विकास, तसेच सांस्कृतिक पर्यटन प्रकल्पांद्वारे शहराची ओळख अधिक समृद्ध केली जाईल. अतिक्रमण हटविणे, धोकादायक इमारतींवर कारवाई आणि नवीन आकृतीबंधानुसार मनुष्यबळ वाढविणे या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम व प्रभावी केले जाईल.

हे अंदाजपत्रक केवळ आकडेवारीचा दस्तऐवज नाही, तर वसई-विरारच्या उज्ज्वल भविष्यासाठीची एक प्रेरणादायी दिशा आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे शहर अधिक सुंदर, सुरक्षित, प्रगत आणि अभिमानास्पद बनविण्याचा आपला संकल्प आहे.

अर्थसंकल्पा मधील समाविष्ट असलेल्या ठळक बाबींचा उल्लेख पुढील प्रमाणे.

**आभार,**

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. पालघर जिल्हा पालकमंत्री, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मा. खासदार, मा. आमदार मा. माजी खासदार मा. माजी आमदार यांनी महानगरपालिकेस वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. मा. महापौर, मा. उपमहापौर मा. स्थायी समिती सभापती

यांच्या वेळोवेळीच्या सुचना व सन्मा. गटनेते, सन्मा. सर्व प्रभाग समिती सभापती, सन्मा. सदस्य, सर्व पक्षांचे सन्मा. लोकप्रतिनिधी तसेच सर्व सन्मा. नागरीक यांचे सहकार्याबद्दल मनपुर्वक आभार व्यक्त करतो. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

सन 2025-26 च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन 2026-27 चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक "अ", महानगरपालिकेच्या "अ" अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, दिव्यांग कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, "ब" अंदाजपत्रकाकडे परिवहन सेवेकरीता वर्ग करावयाच्या अशंदानाचे अंदाज, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक "क", वृक्ष निधी अंदाजपत्रक, योजना विशेष निधीचे अदांजपत्रक व इतर आवश्यक सहपत्रे सोबत जोडली आहेत.

**सन 2025-26 चा सुधारीत अर्थसंकल्प रु. 3194 कोटी 71 लक्ष व सन 2026-27 चे मुळ अंदाजपत्रक रु. 4208 कोटी 99 लक्ष (अखेर शिल्लक रु. 2 कोटी 12 लक्ष सह) मंजुरीस्तव सविनय सादर.**

धन्यवाद ! जय हिंद !!

**XXX/-**
**मनोजकुमार सुर्यवंशी** (भा.प्र.से.)
**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्टे

## * महानगरपालिकेच्या दृष्टीक्षेपातील प्रमुख जमा बाबी *

### मालमत्ता कर जमा

महानगरपालिका अधिनियम कलम 127(1) अन्वये मालमत्ता कर हा महानगरपालिकेच्या प्रमुख उत्पन्नाचा स्रोत असून वसई-विरार महानगरपालिका हद्दीत एकूण 10,24,067 इतक्या मालमत्ता आहेत. सन 2025-26 या वित्तीय वर्षात मालमत्ता कराची मागणी रु. 860.44 कोटी असून त्यापैकी आज अखेर रु. 330 कोटी इतकी वसुली करण्यात आलेली आहे. मालमत्ता कर वसुली अधिक प्रभावी करण्यासाठी आठवडे बाजार, गर्दीची ठिकाणे व प्रभाग समिती क्षेत्रात फिरते कर भरणा केंद्र तसेच वसुली कॅम्प आयोजित करण्यात येत आहेत. मालमत्ता धारकांना थकीत कराची एकरकमी भरपाई केल्यास सवलतीची योजना राबविण्यात येत आहे. तसेच कर वसुलीसाठी विशेष पथक नियुक्त करून सोशल मीडियाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. औद्योगिक व वाणिज्य घटक मालमत्तांची तपासणी, थकबाकीदारांवर दंडात्मक कारवाई, तसेच CC व OC प्रमाणपत्र देताना मालमत्ता व पाणीपट्टी थकबाकी नसल्याबाबत दाखला बंधनकारक करण्यात आलेला आहे.

या उपाययोजनांमुळे मालमत्ता कर, उपभोक्ता कर, नोटीस फी, व्याज, शिक्षण कर रिबेट व रोजगार हमी कर रिबेट यामधून **सन 2025-26 मध्ये रु. 527.24 कोटी इतकी जमा अपेक्षित असून सन 2026-27 मध्ये रु. 626.75 कोटी इतकी जमा अपेक्षित आहे.**

### नगर रचना विभाग जमा

नगर रचना विभागाकडे इमारत विकास कामांच्या परवानगी देताना आकारण्यात येणाऱ्या विकास निधी, छाननी शुल्क, प्रशमन आकार (Compounding Charges) तसेच इतर नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या शुल्कांद्वारे महानगरपालिकेस महसूल प्राप्त होत असतो. सदर जमा रक्कम ही बांधकाम परवानगी प्रक्रियेदरम्यान तसेच संबंधित अटी व शर्तींची पूर्तता करताना महानगरपालिकेकडे जमा केली जाते. त्याअनुषंगाने नगर रचना विभागाकडील जमा अंदाज निश्चित करण्यात येत असून, **सन 2025-26 मध्ये रु 221.00 कोटी व सन 2026-27 मध्ये रु. 403.61कोटी इतकी जमा अपेक्षित आहे.**

### अग्नीशमन सेवा

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने उभ्या राहणाऱ्या इमारतींना महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 अन्वये अग्निसुरक्षा व विशेष अग्निसंरक्षण फी (स्क्रुटिनी फी) आकारली जाते. तसेच विशेष अग्निशमन उपकरण मालमत्ता करासोबत वसूल करण्यात येत असून प्रत्यक्ष अग्निशमन सेवा महानगरपालिका क्षेत्राबाहेर उपलब्ध करून दिल्यास त्यासाठीही अग्निशमन फी आकारली जाते. अग्निशमन सेवांमधून **सन 2025-26 मध्ये रु. 41.04 कोटी इतके उत्पन्न अपेक्षित असून सन 2026-27 मध्ये सुमारे रु. 51.60 कोटी जमा होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे.**

### जाहिरात परवाना फी व जागा भाडे

महानगरपालिकेच्या क्षेत्रातील जाहिरात फलक, होर्डिंग व बॅनर यांवर परवाना शुल्क आकारले जाते.अनधिकृत जाहिरातींवर कारवाई करून नियमित शुल्क वसुली केली जात आहे.नवीन जाहिरात जागा निश्चित करून महसूल वाढविण्याचा प्रयत्न आहे. त्यानुसार जाहिरात परवाना व जागा भाडे फी पासून **सन 2025-26 मध्ये. 4.84 कोटी .व सन 2026-27 मध्ये. 10.00 कोटी जमा अपेक्षित आहे.**

## शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन जमा

शहरातील स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत मालमत्तींवर आकारण्यात येणाऱ्या सामान्य करांमधून तसेच विविध स्वच्छता शुल्कांमधून महसूल प्राप्त होतो. स्वच्छ भारत अभियान, C&D व ग्रीन वेस्ट व्यवस्थापन तसेच नवीन शौचालय बांधकामासाठी शासनामार्फत निधी उपलब्ध होत आहे. अस्वच्छता व प्लास्टिक वापरावर कारवाईतूनही उत्पन्न मिळत असून सन 2026-27 मध्ये रु. 20 लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच **सन 2025-26 मध्ये रु. 8.14 कोटी व सन 2026-27 मध्ये एकूण रु. 8.25 कोटी इतकी जमा अपेक्षित आहे.**

## वृक्ष प्राधिकरण

शहरातील विविध विकासकामे, संस्था/खासगी प्रकल्प तसेच वीज मंडळ यांच्या विकास कामांदरम्यान वृक्ष तोड किंवा स्थलांतर करण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाकडे प्रस्ताव प्राप्त होत असतात. सदर प्रस्तावांवर नियमानुसार निर्णय घेऊन आवश्यकतेनुसार नवीन वृक्ष लागवड करण्याचे निर्देश देण्यात येतात. उपलब्ध जागा नसल्यास त्याऐवजी डी.एस.आर. दरानुसार रक्कम वसूल केली जाते. तसेच वृक्ष कर, वृक्ष तोड परवाना शुल्क, विद्युतिकरण दंड, वृक्ष छाटणी/अन्य शुल्क यामधून महसूल प्राप्त होतो. या माध्यमातून **सन 2025-26 मध्ये रु. 10.12 कोटी इतके उत्पन्न अपेक्षित असून सन 2026-27 मध्ये रु. 19.73 कोटी इतके उत्पन्न होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे.**

## पाणीपुरवठा सेवा जमा

पाणीपुरवठा विभागामार्फत पाण्यावर आकारण्यात येणारे विशेष कर, पाणीपुरवठा स्त्रोत विकास शुल्क, नळ जोडणी फी, नळ जोडणी नूतनीकरण फी, अनधिकृत नळ जोडणी दंड तसेच इतर विविध शुल्कांमधून महानगरपालिकेला महसूल प्राप्त होतो. शहरातील वाढत्या विकासकामांमुळे नवीन नळ जोडण्यांची संख्या वाढत असून त्यातून पाणीपुरवठा सेवांमधील उत्पन्नात वाढ होत आहे. **सन 2025-26 मध्ये रु. 149.18 कोटी इतके उत्पन्न अपेक्षित असून सन 2026-27 मध्ये रु. 408.84 कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.**

## संकिर्ण जमा

महानगरपालिकेच्या इतर उत्पन्नामध्ये सिनेमा प्रयोग शुल्कावरील कर, पे अँड पार्क वाहनतळ व्यवस्था, नो पार्किंगमधील वाहन उचलणी शुल्क, अनधिकृत बांधकाम तोडणी व प्रशासकीय शुल्क, जुना भंगार विक्रीतून मिळणारे उत्पन्न, विविध परवाना फी तसेच रुग्णालय व इतर आस्थापनांच्या नोंदणी शुल्कांचा समावेश होतो. या विविध माध्यमांतून महानगरपालिकेला महसूल प्राप्त होत असून **सन 2025-26 मध्ये रु. 68.39 कोटी तर सन 2026-27 मध्ये रु. 92.36 कोटी इतके जमा अपेक्षित आहे.**

## महसुली अनुदाने

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, दिनांक 29 जून 2017 नुसार वस्तू व सेवा कर (GST) अंमलबजावणीमुळे महानगरपालिकांना होणाऱ्या महसुली तुटीची भरपाई करण्यासाठी राज्य शासनामार्फत अनुदान वितरित करण्यात येते. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेस प्रति महिना सुमारे रु.... इतके अनुदान प्राप्त होत आहे. **त्यातून सन 2025-26 या आर्थिक वर्षामध्ये रु. 523.48 तसेच सन 2026-27 मध्ये 8 टक्के वाढ गृहित धरून रु. 565.36 कोटी इतके अनुदान अपेक्षित आहे. याशिवाय मुद्रांक शुल्क अनुदान, रस्ता अनुदान वाचनालय अनुदान अशा विविध स्वरूपाच्या महसुली अनुदानापोटी सन 2025-26 मध्ये एकूण रु. 707.84 आणि सन 2026-27 मध्ये रु. 734.64 इतके महसुली अनुदान शासनाकडून अपेक्षित आहे.**

## भांडवली अनुदाने

जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) मार्फत तसेच राज्य शासनाकडून स्थानिक विकास कार्यक्रम, मूलभूत नागरी सुविधा विकास, दलित वस्ती सुधारणा, नागरी दलित वस्ती सुधारणा अनुदान तसेच केंद्र शासन पुरस्कृत योजनांअंतर्गत भांडवली अनुदान प्राप्त होते. 15 वा वित्त आयोग अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा योजना व अमृत योजना 2.0 अंतर्गत पायाभूत सुविधा विकासासाठीही निधी उपलब्ध होत आहे. **सन 2025-26 मध्ये विविध योजनांअंतर्गत रु. 320.88 कोटी इतके भांडवली अनुदान अपेक्षित असून सन 2026-27 मध्ये रु. 642.61 कोटी इतके अनुदान प्राप्त होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे.**

# * महानगरपालिकेच्या खर्चाच्या प्रमुख बाबी *

## आस्थापना खर्च

महानगरपालिकेच्या विस्तारित कार्यकक्षेचा विचार करता आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासकीय, तांत्रिक व इतर सेवा प्रभावीपणे पुरविणे गरजेचे आहे. मंजूर आकृतिबंधानुसार आस्थापनेवरील सर्व पदे भरलेली असणे आवश्यक असून, रिक्त पदे अभिकर्ता नेमून अथवा उपलब्ध मनुष्यबळाच्या माध्यमातून सेवा सुरू ठेवण्यात येत आहेत. स्थायी, अस्थायी व ठेका कर्मचाऱ्यांमुळे आस्थापना खर्चात वाढ होत आहे.

**त्या अनुषंगाने आस्थापना खर्च सन 2025-26 मध्ये रु. 213.30 कोटी इतका असून, सन 2026-27 या वित्तीय वर्षासाठी रु. 284.22 कोटी इतका अपेक्षित आहे.**

## पथदीप व विद्युत व्यवस्था

सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेसाठी नवीन ऑक्टोगोनल पोल उभारणी व एलईडी दिवे बसविणे या कामांसाठी अंदाजे रु. 15 कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्तावित आहे. तसेच, मुख्य प्रशासकीय इमारतीवर 250 कि.वॅ. क्षमतेची तसेच इतर कार्यालयीन इमारतींवर 5 ते 10 कि.वॅ. क्षमतेची सौर यंत्रणा बसविणे व उद्यान व तलाव परिसरातील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी अंदाजे रु... इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

**वरील बाबींसाठी सन 2025-26 मध्ये एकूण रु. 68.22 कोटी व सन 2026-27 मध्ये रु. 112.26 इतकी अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.**

## नगर रचना

नवीन UDCPR च्या नियमानुसार महानगरपालिका हद्दीत विकासकांकडून बांधकाम परवानगी देताना वसूल करण्यात येणाऱ्या अधिमूल्य शुल्कापैकी 50% रक्कम शासनास भरावी लागते. तसेच जी.आय.एस. मॅपिंग/लँड युज अपडेटेशन, ऑटो डी.सी.आर., सी.आर.झेड., रस्ते, आकस्मिक खर्च इत्यादी बाबींसाठी **सन 2025-26 मध्ये रु. 77.33 कोटी व सन 2026-27 मध्ये रु. 90.53 कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.**

## शहर विकास घनकचरा व्यवस्थापन

महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन रस्ते सफाई, कचरा संकलन व वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी स्वतंत्र अभिकर्ता नेमणूक तसेच आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात येत आहे. शहरात निर्माण होणारा घनकचरा महानगरपालिकेच्या निश्चित क्षेत्रावर वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी Biomining प्रक्रिया तसेच C & D वेस्ट, ग्रीन वेस्ट व बायोगॅस प्रकल्प राबविण्याचे नियोजन आहे. तसेच गटर सफाई यांत्रिक पद्धतीने करण्यासाठी आवश्यक मशीनरी खरेदी करण्यात आलेली आहे.

वरील बाबींसाठी आर्थिक वर्ष 2026-27 मध्ये आवश्यक निधीची तरतूद प्रस्तावित आहे.

# अग्निशमन सेवा

महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागांतर्गत अग्निशमन केंद्रांमार्फत महानगरपालिका क्षेत्रात आग प्रतिबंधक व बचाव कार्य प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. अग्निशमन यंत्रणा अधिक आधुनिक व सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून त्यासाठी **सन 2025-26 मध्ये रु .21.98 व सन 2026-27 मध्ये रु. 53.70 कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.**

# रुग्णालयीन सेवा (वैद्यकीय आरोग्य)

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची ७ रुग्णालये, २ माताबाल संगोपन केंद्रे, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, १५ हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व ३२ आयुष्यमान आरोग्य मंदिरे कार्यरत आहेत. नागरिकांना सर्वसमावेशक आरोग्य सेवा देण्यासाठी नवीन डायलेसिस सेंटर उभारण्यात आले असून १२ मशीन कार्यरत आहेत. बाह्यरुग्ण, आंतररुग्ण, प्रसूती सेवा, विविध शस्त्रक्रिया, सोनोग्राफी, गर्भवती माता आरोग्य तपासणी, टेली कन्सल्टेशन, लसीकरण, आरोग्य जनजागृती, मोफत औषधे व तपासण्या, रक्त तपासणी इत्यादी सेवा दिल्या जात आहेत. एकूण रुग्णालय व्यवस्थापनासाठी **सन 2025-26 मध्ये रु 52.78 कोटी व सन 2026-27 मध्ये रु. 77.50 कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.**

# दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजना

दिव्यांग कल्याणासाठी विविध योजनांद्वारे दिव्यांगांच्या टक्केवारीनुसार प्रतिमहिना अनुदान, व्यवसाय कर्ज, क्रीडा प्रोत्साहन, आजारी दिव्यांगांना अर्थसहाय्य, संस्थांना अनुदान तसेच कौशल्य प्रशिक्षण व रोजगार मेळावे आयोजित केले जातात. भौतिकोपयोगी साधनांचे वितरण, दिव्यांग मेळावे व दिव्यांग भवन निर्मिती यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. या **योजनांसाठी सन 2025-26 मध्ये रु. 16.89 कोटी व सन 2026-27 मध्ये रु. 18.88 कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.**

# महिला बालकल्याण कार्यक्रम

महिला व बालकल्याणासाठी विविध योजनांतर्गत मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य, कुटुंब प्रमुख 75% किंवा त्याहून अधिक दिव्यांग असल्यास सहाय्य, तसेच इयत्ता 1 ली ते 4 थी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य देण्यात येते. विविध एकूण 40 योजना मागील पाच वर्षांत राबविण्यात आल्या आहेत. **यासाठी सन 2025-26 मध्ये रु. 24.30 कोटी व सन 2026-27 मध्ये रु. 28.04 कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.**

# मागासवर्गीय कल्याणकारी योजना व पी बजेट

दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत अधिक अनुदान उपलब्ध करून सार्वजनिक सुविधा निर्माण करणे, कमी उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी कृषी साहित्य, बियाणे व पुरवठा, दुर्बल घटकांसाठी घरे, तसेच रस्ते, गटारे, दिवाबत्ती, समाजमंदिरे व सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या योजना राबविण्यात येत आहेत. यासाठी **सन 2025-26 मध्ये रु. 40.98 कोटी व सन 2026-27 मध्ये रु. 57.70 कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.**

## बांधकाम व्यवस्था

महानगरपालिका क्षेत्रातील डांबरीकरण केलेल्या रस्त्यांची दुरुस्ती व कॉंक्रीटीकरण करणे तसेच विकास कामांसाठी रस्ते, UTWT, शहर सौंदर्यीकरण, चौक, वाहतूक बेट, समाजमंदिर, नाट्यगृह, मार्केट, तलाव सुशोभीकरण व इतर नागरी सुविधा कामे यासाठी निधी नियोजित करण्यात आला आहे. विविध विकास **कामांसाठी सन** 2025-26 **मध्ये रु.** 928.09 **कोटी व** 2026-27 **मध्ये रु.** 1792.07 **कोटी तरतूद अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आली आहे.**

## आपत्ती व्यवस्थापन

महानगरपालिकेच्या हद्दीत उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचे नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी **सन** 2025-26 **मध्ये रु.** 3.07 **कोटी व सन** 2026-27 **मध्ये रु.** 18.44 **कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.**

## उद्यान विभाग

प्रभागनिहाय उद्यानांचा विकास, जॉगिंग ट्रॅक, लहान मुलांचे खेळणी साहित्य, बैठक व्यवस्था तसेच उद्यानांची देखभाल व दुरुस्ती यासाठी खर्च प्रस्तावित असून **सन** 2025-26 **मध्ये रु.** 6.51 **कोटी व सन** 2026-27 **मध्ये रु.** 25.36 **कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.**

## वृक्ष व पर्यावरण

वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत झाडांची लागवड, वृक्षसंवर्धन, नर्सरी निर्मिती, वृक्ष गणना व पर्यावरण संवर्धनाशी संबंधित विविध उपक्रमांसाठी **सन** 2025-26 **मध्ये रु.** 6.23 **कोटी व सन** 2026-27 **मध्ये रु.** 36.06 **कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.**

## लोकशिक्षण व सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा

ऐतिहासिक वारसा जतन करणे, सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रम, सण-उत्सव, सांस्कृतिक स्पर्धा, राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंती/पुण्यतिथी साजरी करणे तसेच गुणवान व्यक्ती व संस्थांचा गौरव, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम, नोंदणीकृत संस्थांना आर्थिक सहाय्य, महापौर चषक, शालेय कला-क्रीडा व विशेष प्राविण्य प्राप्त खेळाडूंना अर्थसहाय्य अशा विविध उपक्रमांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. **सन** 2025-26 **मध्ये एकूण रु.** 35.63 **कोटी व सन** 2026-27 **मध्ये एकूण रु.** 84.51 **कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.**

## पाणीपुरवठा व योजना खर्च

सदर शहरास पेल्हार, उसगांव, सूर्या टप्पा-१ व सूर्या टप्पा-३ तसेच MMRDA अंतर्गत पाणीपुरवठा योजनांमधून दररोज सुमारे 370 द.ल.ली. पाणी उपलब्ध होत आहे. अमृत 1.0 अंतर्गत शहरातील विविध भागात जलवाहिन्या अंथरणे व जलकुंभ उभारणीची कामे पूर्ण/प्रगतीपथावर असून त्याचा थेट लाभ नागरिकांना मिळत आहे.

अमृत 2.0 अंतर्गत पाणीपुरवठा योजनांचे बळकटीकरण व विस्तारीकरण तसेच मलनिस्सारण प्रकल्पांची कामे मंजूर झाली आहेत. नगरोत्थान योजनेअंतर्गत नवीन पाणीपुरवठा व संबंधित पायाभूत सुविधांची उभारणी प्रस्तावित आहे. या सर्व योजनांसाठी **सन** 2025-26 **मध्ये रु.** 387.14 **कोटी तर सन** 2026-27 **मध्ये रु.** 731.85 **कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.**

## नागरीकांसाठीच्या सवलती

1 आगामी वर्षात देखील 5 वर्षाचा मालमत्ता कर आगाऊ भरणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात 15 % दराने प्रोत्साहनपर सवलत देण्याची तरतुद आहे. परंतू सदर मागणी बीलाचा भरणा हा त्यांनी बिल मिळाल्यापासून 15 दिवसांत करणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात मालमत्ता करात किंवा इतर करांमध्ये वाढ झाल्यास त्या कराच्या रकमेच्या फरकाचा भरणा मालमत्ता धारकास करावा लागेल.

2 स्वातंत्र्य सैनिक व आजी माजी सैनिक यांच्या पश्चात त्यांची विधवा पत्नी हयात असेपर्यंत त्यांच्या राहत्या स्वमालकीच्या अधिकृत निवासी सदनिकेस वेळोवेळीच्या मागणी नुसार मालमत्ता करात 100 % सुट आहे.

3 नव्याने विकसित केल्या जाणा-या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग योजनेची अंमलबजावणी सक्तीने चालू असून यामुळे नविन इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था झाली आहे. त्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढणेस मदत होणार आहे. सबब अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत महानगरपालिकेच्या संमतीने रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामध्ये सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ट असल्याने मालमत्ता कराच्या 2% सवलतीसह योजना खर्चाच्या 20 % परंतू अधिकतम रु. 1 लक्ष इतका खर्च अनुदान अदा करणेची योजना यावर्षी देखील पुढे चालू ठेवण्यात आली आहे.

4 निसर्ग ऋण प्रकल्प राबविण्यासाठी एकत्रित मालमत्ता कराच्या 2% सवलतीसह योजना खर्चाच्या 20 % परंतू अधिकतम रु. 1 लक्ष अनुदान अदा करणेची योजना यावर्षी देखील पुढे चालू ठेवण्यात आली आहे.

# अर्थसंकल्पीय ठळक/ नाविन्यपूर्ण बाबी

## केळीचे गाव – नंदाखाल

केळी उत्पादनाला चालना देण्यासाठी "केळीचे गाव" हा कृषी व पर्यटन विकास उपक्रम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत केळी प्रक्रिया, प्रशिक्षण, प्रदर्शन व विक्रीसाठी सुविधा विकसित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन व बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येईल. या उपक्रमामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होऊन पर्यटनालाही प्रोत्साहन मिळेल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 1.5 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## मच्छीमारांचे गाव – सांडोर

पारंपरिक मच्छीमार संस्कृती जतन व पर्यटन वाढीसाठी "मच्छीमारांचे गाव" हा थीम आधारित उपक्रम विकसित करण्यात येणार आहे. या अंतर्गत पारंपरिक नौका, जाळी, सांस्कृतिक कलाकृती व स्थानिक जीवनशैलीचे प्रदर्शन करण्यात येईल तसेच स्थानिक उत्पादनांसाठी विक्री केंद्र व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल. या उपक्रमामुळे पर्यटन वाढीस चालना मिळून स्थानिकांना रोजगार संधी उपलब्ध होतील. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 2.50 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## रांगोळीचे गाव – जुचंद्र

पारंपरिक रांगोळी कलेचा वारसा जपण्यासाठी "रांगोळीचे गाव" हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, रांगोळी प्रदर्शन, प्रशिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून पर्यटनाला चालना देण्याचा उद्देश आहे. या उपक्रमामुळे स्थानिक कला संवर्धनाबरोबरच रोजगार संधी निर्माण होण्यास मदत होईल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 1.5 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## फुलांचे गाव

वसई-विरार परिसरातील अनुकूल हवामानाचा लाभ घेऊन फुलशेतीला प्रोत्साहन देण्यासाठी "फुलांचे गाव" हा कृषी व पर्यटन विकास उपक्रम राबविण्यात येणार आहे. प्रशिक्षण व प्रदर्शन केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने लागवड, व्यवस्थापन व विक्रीबाबत मार्गदर्शन देण्यात येईल. या उपक्रमामुळे स्थानिक उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होऊन रोजगार व पर्यटन वाढीस मदत होईल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 1 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## दिव्यांग पार्क

शहरातील दिव्यांग नागरिकांच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक विकासाला चालना देण्यासाठी दिव्यांगांसाठी अनुकूल सुविधा असलेला "दिव्यांग पार्क" विकसित करण्यात येणार आहे. या पार्कमध्ये व्हीलचेअर-फ्रेंडली रॅम्प व पाथवे, स्पर्शाद्वारे मार्गदर्शन करणारे टॅक्टाईल पथ, दिव्यांग अनुकूल खेळणी व व्यायाम साहित्य, श्रवण दिव्यांगांसाठी ध्वनी व दृश्य सूचना बोर्ड तसेच योग व फिजिओथेरपीसाठी स्वतंत्र जागा विकसित करण्यात येईल. या उपक्रमामुळे दिव्यांग नागरिकांना सुरक्षित व सुलभ वातावरणात विरंगुळा, व्यायाम व सामाजिक सहभागाची संधी उपलब्ध होईल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 3 कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

## संविधान पार्क

नागरिकांमध्ये भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण करून समानता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता या संविधानिक मूल्यांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने "संविधान पार्क" विकसित करण्यात येणार आहे. या अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसद भवनाची प्रतिकृती, संविधानातील प्रमुख अधिकार व कर्तव्ये

दर्शविणारे म्युरल वॉल, संविधानाचे महत्त्वपूर्ण स्तंभ दर्शविणारे डिस्प्ले एरिया, ओपन एअर ॲम्फीथिएटर तसेच लँडस्केप गार्डन विकसित करण्यात येईल. याशिवाय म्युझियम रूम, होलोग्राफी रूम, लायब्ररी व शैक्षणिक प्रदर्शनासाठी स्वतंत्र जागा निर्माण करण्यात येणार आहे. हा उपक्रम शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरून नागरिकांसाठी प्रेरणादायी व ज्ञानवर्धक सार्वजनिक स्थळ निर्माण करेल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 4.40 कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

## श्वान निवारा गृह भटक्या श्वानांसाठी (Dog Shelter)

शहरातील भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनासाठी तसेच नागरिकांची सुरक्षितता व प्राणी कल्याण लक्षात घेऊन Dog Shelter उभारण्याचा उपक्रम हाती घेण्यात येत आहे. या अंतर्गत भटक्या कुत्र्यांसाठी सुरक्षित निवारा, अन्न-पाणी व्यवस्था, वैद्यकीय तपासणी, लसीकरण व नसबंदी सुविधा विकसित करण्यात येतील. यामुळे रस्त्यांवरील भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवणे, प्राण्यांचे संरक्षण करणे व नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देणे शक्य होईल. या प्रकल्पासाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 5 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## वृक्ष गणना व वृक्ष प्रदर्शन

शहरातील हरित क्षेत्र गणना करणे व वृक्ष प्रदर्शन हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शहरातील वृक्षांची संख्या, प्रजाती, उंची व आरोग्य स्थिती यांची नोंदणी करण्यात येईल. तसेच नागरिकांमध्ये पर्यावरण जागरूकता वाढविण्यासाठी वृक्ष प्रदर्शन, माहिती फलक व हरित उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल. या उपक्रमामुळे वृक्ष संवर्धन अधिक प्रभावी होऊन शहराच्या पर्यावरणीय नियोजनाला गती मिळेल. यासाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 4.50 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## अग्निशमन यंत्रणा सक्षमीकरण योजना

शहरातील आपत्कालीन परिस्थितींना तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने अग्नीशमन दल व्यवस्था अंतर्गत नवीन 5 ठिकाणी अग्नीशमन केंद्र उभारण्यात येणार आहेत. वाढत्या शहरीकरण व विस्तारित हद्द लक्षात घेऊन आवश्यक ठिकाणी आधुनिक सुविधा, अत्याधुनिक उपकरणे व वाहनांसह अग्नीशमन केंद्र विकसित करण्यात येतील. या उपक्रमामुळे प्रतिसाद वेळ कमी होऊन आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल व शहराची सुरक्षा यंत्रणा मजबूत होण्यास मदत होईल. या कामासाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 20 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## शहर क्रीडा दत्तक योजना

शहरातील उदयोन्मुख खेळाडू व क्रीडा संघांना प्रोत्साहन देऊन क्रीडा संस्कृतीचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने "शहर क्रीडा दत्तक योजना" राबविण्यात येत आहे. या अंतर्गत निवड प्रक्रियेद्वारे पात्र खेळाडू व संघांना दर्जेदार प्रशिक्षण, आवश्यक क्रीडा साहित्य, स्पर्धांमध्ये सहभागासाठी आर्थिक सहाय्य तसेच मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. स्थानिक स्तरावरील प्रतिभेला सक्षम व्यासपीठ मिळून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्यास प्रोत्साहन मिळेल, तसेच शहराची क्रीडा क्षेत्रातील ओळख अधिक बळकट होण्यास मदत होईल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 2 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## E-Governance सक्षमीकरण योजना

महानगरपालिकेच्या अंतर्गत कामकाजात गती, पारदर्शकता व सुसूत्रता वाढविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत E-Governance ची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या अंतर्गत कार्यालयीन

फाईल प्रक्रिया, पत्रव्यवहार, अभिलेख व्यवस्थापन, विभागांमधील समन्वय व अहवाल प्रणाली डिजिटल स्वरूपात विकसित करून एकात्मिक कार्यपद्धती तयार करण्यात येईल. यामुळे कागदविरहित कामकाजाला चालना मिळून दैनंदिन प्रक्रिया अधिक सोपी व जलद होण्यास मदत होईल. या उपक्रमासाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 6 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र

शहरातील जेष्ठ नागरिकांना सुरक्षित, आनंददायी व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत बसण्याची व्यवस्था, वाचन कोपरा, हलके व्यायाम व योगासाठी सुविधा, मनोरंजन साधने तसेच सामाजिक संवादासाठी स्वतंत्र जागा विकसित करण्यात येईल. यामुळे जेष्ठ नागरिकांना सक्रिय व निरोगी जीवनशैलीस प्रोत्साहन मिळून त्यांचा सामाजिक सहभाग वाढण्यास मदत होईल. या उपक्रमासाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 25 लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

## शहर तलाव सुशोभीकरण व संवर्धन योजना

शहरातील तलावांचे संवर्धन करून परिसर अधिक स्वच्छ, सुरक्षित व आकर्षक करण्याच्या उद्देशाने "शहर तलाव सुशोभीकरण व संवर्धन योजना" राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत तलाव परिसराची स्वच्छता, सुशोभीकरण, पायवाटा, बसण्याची व्यवस्था, हरित विकास तसेच नागरिकांसाठी आवश्यक सुविधा विकसित करण्यात येतील. या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळून नागरिकांना विरंगुळा व पर्यटनासाठी दर्जेदार सार्वजनिक स्थळ उपलब्ध होईल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 15.50 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## शहर जलसाठा बळकटीकरण योजना

शहरातील वाढत्या पाणीपुरवठा गरजा लक्षात घेऊन पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी "शहर जलसाठा बळकटीकरण योजना" अंतर्गत 11.5 दशलक्ष लिटर क्षमतेचे 10 नवीन जलकुंभ उभारण्यात येणार आहेत. आधुनिक तांत्रिक मानकांनुसार जलकुंभ बांधून विविध भागांमध्ये नियमित व समतोल पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यात येईल. या उपक्रमामुळे पाणी वितरण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना दर्जेदार पाणी सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 5 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## शहर ऊर्जा कार्यक्षम LED प्रकाश योजना – फेज २

शहरातील ऊर्जा बचत व प्रभावी प्रकाश व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने यापूर्वी फेज १ अंतर्गत काही ठिकाणी जुने sodium vapour चे दिवे बदलून LED दिवे बसविण्यात आले आहेत. उर्वरित भागांमध्ये अद्याप असलेले जुने दिवे बदलण्यासाठी आता फेज २ अंतर्गत नवीन 17600 LED दिवे बसविण्याचा उपक्रम हाती घेण्यात येत आहे. प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते व सार्वजनिक ठिकाणी आधुनिक LED प्रकाशयोजना विकसित करून वीज बचत साध्य करणे तसेच नागरिकांना सुरक्षित व उज्ज्वल वातावरण उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 25 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## मोफत रुग्ण निदान व उपचार सुविधा योजना

शहरातील जोखीम ग्रस्त, कामगार वर्ग, वीटभट्टी व बांधकाम मजूर आणि बेवारस रूग्णांना सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ऑपरेशन चार्जेस, लॅब तपासण्या, सोनोग्राफी, एक्स-रे, MRI व CT Scan या सुविधा मोफत उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांद्वारे गरजू रुग्णांना आवश्यक तपासण्या व उपचारांचा आर्थिक भार कमी करून वेळेत वैद्यकीय सेवा मिळण्यास मदत होईल. या योजनेमुळे नागरिकांच्या आरोग्य संरक्षणाला बळकटी मिळून सामाजिक सुरक्षा वाढीस चालना मिळेल. या उपक्रमासाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 1.30 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## रुग्ण आहार व पोषण सहाय्य योजना (महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत)

सदर योजने अंतर्गत महानगरपालिका रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांना वेळेवर व पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्यासाठी "रुग्ण आहार व पोषण सहाय्य योजना" राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत रुग्णांना भोजन, चहापान व अल्पोपाहाराची सुविधा देऊन उपचारादरम्यान त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्यात येईल. या उपक्रमामुळे रुग्णांना आधार मिळून आरोग्य सेवांची गुणवत्ता अधिक सुधारण्यास मदत होईल. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 3.20 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

## शीतगृहसह बहुउद्देशीय शेतकरी-व्यापारी व ग्राहक मार्केट योजना

शेतकरी, व्यापारी व ग्राहकांना एकाच ठिकाणी आधुनिक व सुसज्ज बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शीतगृहसह बहुउद्देशीय मार्केट उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत भाजीपाला व फळांसाठी साठवण सुविधा, शीतगृह व्यवस्था, विक्री स्टॉल, स्वच्छता सुविधा व आवश्यक पायाभूत व्यवस्था विकसित करण्यात येईल. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी योग्य बाजारपेठ उपलब्ध होऊन मालाची नासाडी कमी होण्यास मदत होईल तसेच ग्राहकांना दर्जेदार व ताज्या वस्तू सहज मिळू शकतील. या योजनेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात ₹ 5 कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

# जमेच्या ठळक बाबी

(आकडे लाखात)

| अ.क्र. | जमा लेखाशिर्ष | प्रत्यक्ष रकमा 2024-25 | सुधारीत अर्थसंकल्प 2025-26 | मुळ अंदाज 2026-27 |
|---|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर व इतर कर | 34040.24 | 52724.83 | 62675.00 |
| 2 | स्थानिक संस्था कर जमा | 1322.02 | 1575.00 | 1012.00 |
| 3 | जाहिरात कर जमा | 486.12 | 484.28 | 1000.50 |
| 4 | मालमत्ता उपयोगिता व सेवा यांचे उत्पन्न | 212.22 | 337.00 | 373.50 |
| 5 | अग्निशमन सेवा जमा | 3454.69 | 4104.98 | 5160.00 |
| 6 | नगररचना जमा | 20812.16 | 22100.25 | 40361.25 |
| 7 | वाचनालय जमा | 22.28 | 37.00 | 39.81 |
| 8 | रुग्णालय सेवा जमा | 92.17 | 85.50 | 91.20 |
| 9 | बाजार फी/ तलाव लिलाव जमा | 798.17 | 989.00 | 1457.01 |
| 10 | स्वच्छता सेवा जमा | 704.21 | 814.00 | 825.25 |
| 11 | पाणी पुरवठा सेवा जमा | 11569.83 | 14918.51 | 40884.60 |
| 12 | संकिर्ण जमा | 6494.67 | 6839.40 | 9236.71 |
| 13 | भांडवली अनुदाने | 9682.20 | 32088.59 | 64261.04 |
| 14 | महसुली अनुदाने | 52995.43 | 70784.14 | 73464.54 |
| 15 | वृक्ष प्राधिकरण जमा | 1149.52 | 1012.72 | 1973.10 |
| 16 | ऋण निलंबन जमा | 30487.22 | 25155.42 | 44766.87 |
| | एकूण जमा | 174323.12 | 234050.62 | 347582.37 |
| | प्रारंभिक शिल्लक | 123529.89 | 85420.66 | 73316.82 |
| | प्रारंभिक शिल्लकेसह एकूण जमा | 297853.01 | 319471.29 | 420899.19 |

# खर्चाच्या ठळक बाबी

(आकडे लाखात)

| अ.क्र. | खर्च लेखाशिर्ष | प्रत्यक्ष रकमा 2024-25 | सुधारीत अर्थसंकल्प 2025-26 | मुळ अंदाज 2026-27 |
|---|---|---|---|---|
| 1 | कर्मचारी वेतन भत्ते खर्च | 9529.89 | 10251.31 | 14531.11 |
| 2 | अस्थायी/ ठेका कर्मचारी खर्च | 9833.82 | 11079.38 | 13891.16 |
| 3 | सा. प्र. व इतर कार्यालयीन खर्च | 8224.48 | 10162.12 | 15741.25 |
| 4 | नगर रचना खर्च | 13225.22 | 7733.20 | 9053.00 |
| 5 | सदस्यांसाठी खर्च | 25.30 | 82.27 | 510.00 |
| 6 | उद्यान विकास खर्च | 330.35 | 651.33 | 2536.00 |
| 7 | दिवाबत्ती व्यवस्था खर्च | 4584.33 | 6622.88 | 11026.01 |
| 8 | अग्निशमन व्यवस्था | 967.22 | 2198.81 | 5370.00 |
| 9 | शहर स्वच्छता खर्च | 28635.27 | 27447.00 | 45164.55 |
| 10 | रुग्णालय व्यवस्था खर्च | 4568.30 | 5278.24 | 7750.67 |
| 11 | मागसवर्गीय कल्याणकारी योजना | 794.81 | 4098.40 | 5770.55 |
| 12 | आपत्ती व्यवस्थापण व नियंत्रण खर्च | 25.57 | 307.00 | 1844.46 |
| 13 | दहन दफन भुमी व्यवस्था खर्च | 563.00 | 948.83 | 4462.55 |
| 14 | क्रिडा विषयक तरतुदी | 1386.50 | 1787.63 | 4550.00 |
| 15 | दिव्यांग कल्याण खर्च | 702.11 | 1689.42 | 1888.42 |
| 16 | तलाव व्यवस्थापन खर्च | 1612.09 | 1421.09 | 1682.01 |
| 17 | बांधकाम विभाग दुरुस्ती व विकास कामे खर्च | 72989.25 | 92809.91 | 179207.71 |
| 18 | महिला बाल कल्याण खर्च | 1522.58 | 2430.72 | 2804.11 |
| 19 | वाचनालय व्यवस्था | 92.55 | 118.18 | 254.00 |
| 20 | सामाजिक व राष्ट्रीय दिन कार्यक्रम खर्च | 1019.06 | 1657.33 | 3647.26 |
| 21 | प्रशासकीय खर्च | 641.08 | 3439.51 | 2824.91 |
| 22 | पाणी पुरवठा व्यवस्थापन | 21061.09 | 26027.65 | 31578.47 |
| 23 | मुख्य नाले खोदाई | 2160.47 | 1800.00 | 1600.00 |
| 24 | परिवहन सेवा अशंदान | 987.71 | 2500.00 | 6500.00 |
| 25 | वनीकरण व पर्यावरण खर्च | 911.54 | 623.81 | 3606.50 |
| 26 | ऋण निलंबन खर्च | 26038.77 | 22988.44 | 42892.47 |
| | एकूण खर्च | 212432.35 | 246154.47 | 420687.17 |
| | अखेर शिल्लक | 85420.66 | 73316.82 | 212.02 |
| | अखेर शिल्लकेसह एकूण | 297853.01 | 319471.29 | 420899.19 |